Vol 6 Issue 3 September 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 3 | September - 2016

GRT Golden Research Thoughts

# विदर्भातील रामटेक पर्यटन केंद्र व पर्यटक समाधान – एक अभ्यास

श्री. गणेश बी. बुटके[1] , डॉ. तेजसिंग के. किरार्ड[2]
[1]संशोधक , नागपूर.
[2]कार्यकारी प्राचार्य एन. डब्लू. सी. महाविद्यालय, सिंदेवाही.

## सारांश

पर्यटन हा मानवाचा वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटन व्यवसायावर पर्यटकांची आवडी–निवडी व कल्पना यांचा बराच प्रभाव पडतो. त्यामुळे हा व्यवसाय अत्यंत संवेदनक्षम बनलेला आहे. पर्यटकांच्या बदलत्या स्वभावामुळे आराम आणि मनोरंजन संबंधी पर्यटन क्षेत्राचे महत्व वाढत आहे. भूगोल हा विषय पर्यटनाकरिता अनिवार्य आहे. पर्यटन व्यवसाय विकासासाठी पर्यटकांचे समाधान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पर्यटकांचे समाधान हे त्यांना मिळणा–या आकर्षित सुविधांवर अवलंबून असते. एखादे पर्यटन स्थळ प्रसिध्द करण्यासाठी तेथील रहवास्यांची व पर्यटकांची महत्त्वाची भूमिका असते. पर्यटकांचे समाधान यावर पर्यटन स्थळाचा विकास अवलंबून असतो. पर्यटकांचे समाधान हे त्यांना मिळणा–या राहण्याच्या सुविधा, भोजन व पेय सेवा, स्थानिक लोकांचे वर्तन, वाहतूकीची सुविधा, नैसर्गिक सौदर्य, खरेदी सुविधा, स्वच्छता, वैयक्तिक सुरक्षितता, मनोरंजन आणि इतर व्यवस्था इत्यादी घटकांवर अवलंबून आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात नागपूर जिल्हयातील रामटेक पर्यटन स्थळासंबंधित पर्यटकांचे समाधान जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**Keywords:** पर्यटक समाधान, पर्यटन स्थळ, रामटेक.

## प्रस्तावना :

रामटेक पर्यटन स्थळ हे महाराष्ट्राच्या पूर्वेला नागपूर जिल्हयात वसलेले आहे. रामटेक गावाच्या चंहुबाजुने हिरवळ आणि पूर्व दिशेला उंच डोंगर हे रामटेकचे वैशिष्ट्ये! ऐतिहासिक आणि पौराणिक महत्व असलेले हे गाव कुणाचे श्रद्धास्थान तर एखादया इतिहासवेडयासाठी पर्यटनस्थळ आहे. नागपूरातील रामटेकच्या गडावरील प्रभू श्रीरामचंद्राचे मंदिर हिंदू धर्मियांचे श्रध्दास्थान आहे. वनवासात असतांना श्रीराम रामटेक येथील गडावर वास्तव्याला होते. त्यामुळे या स्थळाला अन्ययसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.




पर्यटन समाधान हा मानसशास्त्रीय निकाल आहे. याचा संबंध पर्यटकांना मिळणा–या वागणूकीशी आहे. पर्यटनात विविध प्रकाराचे लोक एकमेकांना संपर्क करतात. उदा. पर्यटन वाहतूक सल्लागार, राहण्याची व्यवस्था करणारे, मालक, व्यवस्थापक व पर्यटन मार्गदर्शक इ. या सर्वांमध्ये हितसंबंध असणे गरजेचे आहे. हे नाते पर्यटकांना मिळणा–या समाधानावर अवलंबून असते. त्यामुळे पर्यटन स्थळांच्या संदर्भात पर्यटकांचे समाधान होत आहे की नाही हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्यांचे मत त्यांना मिळणा–या सुविधांबद्दल काय आहे. हे जाणून घेतले पाहिजे.

## उद्दिष्टये :

नागपूर जिल्हयातील रामटेक पर्यटन स्थळासंबंधित पर्यटकांचा समाधान आणि वागणूक यांचा अभ्यास करणे.

## अभ्यास क्षेत्र :

रामटेक हे महाराष्ट्रांच्या पूर्वेस नागपूर जिल्हयात वसलेले प्रसिध्द पर्यटन स्थळ आहे. रामटेकचे राममंदिर धार्मिक स्थळ म्हणून लोकप्रिय आहे. रामटेक हे नागपूर पासून 50 कि.मी. उत्तर दिशेला असून रेखावृत्तीय विस्तार 79'19' उत्तर आणि अक्षवृत्तीय विस्तार 21'23 पूर्व वृत्ताच्या दरम्यान पर्यटन क्षेत्र आहे. रामटेकचे राममंदिर असलेल्या टेकडीची उंची समुद्रसपाटीपासून 326 मीटर आहे.




### संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध प्रबंध पूर्णता क्षेत्र अभ्यास असून प्रश्नावलीद्वारे प्रश्न विचारून पूर्ण केलेला आहे. रामटेक या पर्यटन ठिकाणी संशोधकाद्वारे प्रश्नावलीच्या मदतीने 100 पर्यटकांना प्रश्न विचारून प्राथमिक आणि द्वित्तीय माहिती संकलित करण्यात आली. हा असा एक अभ्यास आहे की, ज्यामध्ये पर्यटकांना मिळणा–या सुविधांमध्ये समाधानी आहेत की नाही हे जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राहण्याची सुविधा, पार्किंग सुविधा, भोजन व पेय सेवा, स्थानिक लोकांचे वर्तन, नैसर्गिक सौंदर्य, खरेदी व्यवस्था, स्वच्छता, वैयक्तिक सुरक्षितता, मनोरंजन व इतर व्यवस्था इ. समाधानी होण्याची मुख्य स्त्रोत आहेत. रामटेक या पर्यटन स्थळी प्रवासांशी प्रत्यक्ष संर्पक साधण्यात आला आणि प्रश्न विचारून त्यांना मिळणा–या सुविधांबद्दल विचारण्यात आले त्यांना मिळणा–या सोयी उत्कृष्ठ, चांगले, समाधानकारक की असमाधानकारक होत्या. या पर्यटकांच्या मतांना नंतर आकडेवरीत परिवर्तित करण्यात आले. जसे 8–10 उत्कृष्ठ, 6–8 चांगले 4–6 समाधानकारक, 0–4 असमाधानकारक घटकानुरूप पर्यटकांचे समाधान मोजण्यात आले. घटकानुरूप सरासरी मुल्य काढून गुणानुक्रम देण्यात आले. निर्देशांक मोजण्याकरिता खालील सुत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

$$Sti = \frac{\sum MiNi}{N}$$

### रामटेक पर्यटन संदर्भात पर्यटकांचे समाधान :

समाधानाचा दर्जा हा पर्यटकांची मानसिक परिस्थिती आहे. सुविधाबद्दल पर्यटकांचे मत पर्यटन विकासासाठी गरजेचे आहे. दहा महत्वाचे घटक घेण्यात आले जे समाधानाच्या पातळीवर परिणाम करतात. समाधान सारणी पध्दती द्वारे पर्यटकांच्या समाधानाची गणना करण्यात आली आहे.

**तक्ता क्र. 1 घटकानुरूप समाधान**

| अ. क्र. | घटक | उत्कृष्ट | चांगला | समाधानकारक | असमाधानकारक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | राहण्याची सुविधा | 24 | 25 | 35 | 16 | 100 |
| 2. | पार्किंग सुविधा | 11 | 39 | 20 | 30 | 100 |
| 3. | भोजन व पेय सेवा | – | 19 | 17 | 64 | 100 |
| 4. | स्थानिक लोकांचे वर्तन | – | 17 | 54 | 29 | 100 |
| 5 | नैसर्गिक सौंदर्य | 32 | 48 | 14 | 06 | 100 |
| 6. | खरेदी सुविधा | 18 | 33 | 28 | 21 | 100 |
| 7. | स्वच्छता | – | 37 | 41 | 22 | 100 |
| 8. | वैयक्तिक सुरक्षितता | 38 | 28 | 26 | 08 | 100 |
| 9. | मनोरंजन | – | 10 | 23 | 67 | 100 |

तक्ता क्र. 1 मधून रामटेक पर्यटन स्थळासंदर्भात समाधानाचा दर्जा मिळतो. यामध्ये उत्कृष्ठ, चांगल्या, समाधानकारक आणि असमाधानकारक या क्रमामध्ये विविध घटकांना मिळालेले पर्यटकांचे प्रतिसाद आहेत. प्रवासांना मिळालेल्या सुविधाबद्दल पर्यटकांचे मत नमुद करण्यात आले आहे. वैयक्तिक सुरक्षितता (38), नैसर्गिक सौंदर्य (32), राहण्याची सुविधा (24), खरेदी सुविधा (18), व पार्किंग सुविधा

(11), या घटकरिता उत्कृष्ठ प्रतिसाद पर्यटकांनी नमूद केलेले आहे. तर मनोरंजन (67), भोजन व पेय सेवा (64), पार्किंग सुविधा (30), स्थनिक लोकांचे वर्तन (29), स्वच्छता (22), खरेदी सुविधा (21), राहण्याची सुविधा (16), नैसर्गिक सौदर्य (06), या घटकाकरिता असमाधानकारक पर्यटकांची प्रतिक्रिया दर्शविलेले आहे. नैसर्गिक सौदर्य (48), या घटकाकरिता पर्यटकांचे चांगले प्रतिसाद सर्वात जास्त आणि मनोरंजन (10), घटकरिता सर्वात कमी आहे. तसेच समाधानकारक विभागांतर्गत स्थानिक लोकांचे वर्तन (54), सर्वात जास्त व नैसर्गिक सौदर्य (14), सर्वात कमी असे पर्यटकांचे मत रामटेक पर्यटन स्थळाप्रति आहेत.

### *पर्यटक समाधानाचे सरासरी मुल्य :*

प्रस्तुत समाधानाचे सरासरी मुल्य हे पर्यटकांनी उत्कृष्ठ, चांगला समाधानकारक व असमाधानकारक या घटकांना दिलेली पसंती आहे. पर्यटकांची पसंती आकडेवारीत परिवर्तित करून उत्कृष्ठ (8–10), चांगला (6–8), समाधानकारक (4–6), आणि असमाधानकारक (0–4), असे संख्यात्मक मुल्य देण्यात आले.

### *तक्ता क. 2 – पर्यटक समाधानाचे सरासरी मुल्य*

| अ. क्र. | घटक | संख्यात्मक मुल्य | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उत्कृष्ट | चंगला | समाधानकारक | असमाधानकारक |
| 1. | राहण्याची सुविधा | 9.08 | 6.88 | 5.08 | 2.50 |
| 2. | पार्किंग सुविधा | 9.09 | 6.87 | 5.30 | 2.67 |
| 3. | भोजन व पेय सेवा | – | 6.84 | 5.24 | 2.88 |
| 4. | स्थानिक लोकांचे वर्तन | – | 6.88 | 4.87 | 2.27 |
| 5 | नैसर्गिक सौंदर्य | 9.25 | 7.13 | 5.21 | 3.00 |
| 6. | खरेदी सुविधा | 8.78 | 7.00 | 4.93 | 2.52 |
| 7. | स्वच्छता | – | 7.03 | 5.14 | 2.86 |
| 8. | वैयक्तिक सुरक्षितता | 8.89 | 6.68 | 4.96 | 2.75 |
| 9. | मनोरंजन | – | 6.90 | 5.04 | 2.79 |

प्रस्तुत सारणीमध्ये पर्यटकांच्या समाधानाचे सरासरी मुल्य दर्शविलेले आहे. यावरून असे लक्ष्यात येते की, पर्यटकांनी दिलेल्या उत्कृष्ठ पसंती विभागानुसार नैसर्गिक सौदर्य (9.25), या घटकाकरिता सर्वात जास्त सरासरी मुल्ये दिसून येते. आणि त्यांच्या लागोपाठ पार्किंग सुविधा (9.09), राहण्याची सुविधा (9.08), वैयक्तिक सुरक्षिता (8.89), व खरेदी सुविधा (8.78), असे सरासरी मुल्य पर्यटकांची पसंती दर्शवितात. असमाधानकारक विभागातंर्गत सर्वात जास्त असमाधान स्थानिक लोकांचे वर्तन (2.27), या संबंधित आहे. नंतर राहण्याची सुविधा (2.50), खरेदी सुविधा (2.52), पार्किंग सुविधा (2.67), वैयक्तिक सुरक्षिता (2.75), मनोरंजन (2.79), स्वच्छता (2.86), भोजन व पेय (2.88) आणि नैसर्गिक सौदर्य (3.00), अशाप्रकारे पर्यटकांचे सरासरी मुल्य असमाधान दर्शवितात. पर्यटक प्रतिक्रियांच्या चांगला या पसंती विषयी सर्वात जास्त प्रतिसाद नैसर्गिक सौदर्य (7.13), आणि सर्वात कमी प्रतिसाद वैयक्तिक सुरक्षिता (6.68), या घटकाकरिता आहे. तर समाधान या विभागाला सर्वात जास्त पार्किंग सुविधा (5.30) आणि सर्वात कमी मनोरंजन (5.04) या घटकाकरिता आहे. असे यावरून स्पष्ट होते.

### *पर्यटक समाधानाचे गुणानुक्रम :*

रामटेक पर्यटन स्थळासंदर्भात पर्यटकांचे समाधान निर्देशांक हे सरासरी मुल्याचे एकत्रित सरासरी मुल्य आहे.

### *तक्ता क. 3 पर्यटक समाधानाची सारणी*

| अ.क्र. | घटक | समाधान निर्देशांक | क्रम |
|---|---|---|---|
| 1. | राहण्याची सुविधा | 5.89 | 3 |
| 2. | पार्किंग सुविधा | 5.98 | 2 |
| 3. | भोजन व पेय सेवा | 4.06 | 7 |
| 4. | स्थानिक लोकांचे वर्तन | 3.57 | 9 |
| 5 | नैसर्गिक सौंदर्य | 6.02 | 1 |
| 6. | खरेदी सुविधा | 5.81 | 5 |
| 7. | स्वच्छता | 5.01 | 6 |
| 8. | वैयक्तिक सुरक्षितता | 5.82 | 4 |
| 9. | मनोरंजन | 4.91 | 8 |

पर्यटक समाधानाची सारणी यामध्ये राहण्याची सुविधा (5.89), पार्किंग सुविधा (5.98), भोजन व पेय सेवा (4.06), स्थानिक लोकांचे वर्तन (3.57), नैसर्गिक सौदर्य (6.02), खरेदी सुविधा (5.81), स्वच्छता (5.01), वैयक्तिक सुरक्षिता (5.82) आणि मनोरंजन (4.91) या घटकांना क्रम देवून समाधानाचा दर्जा निश्चित करण्यात आला आहे.

पर्यटन स्थळांचे निरिक्षण केले असता नैसर्गिक सौद्रय यास प्रथम क्रमांक प्राप्त झाले आहे. यावरून रामटेक पर्यटन स्थळांचे

नैसर्गिक दृश्य पर्यटकांचे आकर्षन वाढविते. उंच डोंगर आणि घनदाट जंगल यामुळे पर्यटकांना निसर्गरम्य मनमोहक वातावरण अनुभवता येतो. या पर्यटन स्थळी पोहण्याकरिता वाहतूक व्यवस्था सुरळीत आहे. त्यामुळे पर्यटन स्थळापर्यंत वाहन नेता येतो. पर्यटन स्थळी वाहन ठेवण्याकरिता सुविधा उपलब्ध असल्यामुळे पार्किंग व्यवस्थेला दुसरा क्रमांक मिळाला आहे. पर्यटन स्थळी राहण्याकरिता हॉटेल, धर्मशाळा व रिसोर्ट इ. व्यवस्था आहे. त्यामुळे इतर प्रदेशातून आलेल्या पर्यटकांना थांबण्याची उत्तम सुविधा उपलब्ध असल्यामुळे राहण्याची व्यवस्था या घटकाला तिसरा क्रमांक मिळालेला आहे. रामटेक पर्यटन स्थळी स्थानिक लोकांचे वर्तन, मनोरंजन, भोजन व पेय सेवा, खरेदी सुविधा, स्वच्छता या संदर्भात सुविधांचा अभाव दिसून येतो.

### *निष्कर्ष :*

रामटेक हे महाराष्ट्राच्या नागपूर जिल्हयातील एकमेव प्रसिध्द पर्यटन क्षेत्र आहे. विदर्भातील श्री क्षेत्र रामटेक या स्थानाचे महत्व अनन्यसाधारण असे असुन पुर्व विदर्भाचे ते एक अती प्रचिन तिर्थक्षेत्र आहे. मुळात जरी ते तिर्थक्षेत्र असले तरी रामटेकची रचना एखाद्या किल्ल्यासारखी आहे.

रामटेक पर्यटन स्थळी नैसर्गिक सौदर्य, धार्मिक आणि ऐतिहासिक पार्श्वभुमी हे महत्वाचे आकर्षण आहे. पर्यटकांना पयटन स्थळी मिळालेल्या सुविधांबद्दल समाधानाचे निर्देशांक मोजण्यात आले.

नैसर्गिक सौदर्य, धार्मिकता, राहण्याची सुविधा, वाहतुक व पार्कींग व्यवस्था, ऐतिहासिक पार्श्वभुमी इत्यादी घटक रामटेक पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. पर्यटन स्थळी मिळालेल्या सुविधांबद्दल नैसर्गीक सौदर्य, राहण्याची सुविधा, पार्कींग व्यवस्था इत्यादी घटकांचा परिणाम अधिक आहे. या पर्यटन स्थळी मनोरंजन, स्थानिक लोकांचे वर्तन, भोजन व पेय व्यवस्था, खरेदी सुविधा आणि स्वच्छता या घटकांविषयी पर्यटक असमाधानी आहेत. पर्यटन स्थळी मनोरंजनाची कृती ही पर्यटकांना आनंद देण्याकरीता महत्वपुर्ण आहे म्हणुन रामटेक या पयर्टन स्थळी मनोरंजनाची सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे. भोजन व पिण्याचे पाणी उत्तम स्वरूपाचे उपलब्ध नाही ही एक समस्या आहे. भोजनामध्ये विविधता आणि गुणवत्ता आढळुन येत नसल्यामुळे पर्यटकांचा समाधानाचा दर्जा कमी दिसुन येतो. स्थानिक लोकांचे वर्तन हे 'अतिथी देवो भव' या ओवी प्रमाणे असावे अशी पर्यटकांची अपेक्षा असते. रामटेक पयर्टन स्थळी स्वच्छतेकडे लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. पर्यटकाचे समाधान हे त्यांना मिळणाऱ्या आकर्षित सुविधांवर अवलंबुन असते. पर्यटकांचे समाधान यावर पर्यटन स्थळाचा विकास अवलंबून असतो म्हणुन रामटेक पर्यटन क्षेत्रात राहण्याची सुविधा, पार्कींग सुविधा, भोजन व पेय सेवा, स्थानिक लोकांचे वर्तन, नैसर्गिक सौदर्य, खरेदी सुविधा, स्वच्छता, वैयक्तीक सुरक्षितता आणि मनोरंजन इत्यादी संदर्भात आकर्षक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. कारण पर्यटनाचा विकास करण्यासाठी पर्यटकाची महत्वाची भुमीका असते.

### *संदर्भ*


1.Prof. Gadekar D. J. and Dr. P. H. Mhaske (2010) : The Study of Satisfaction Index in Facility of Shanishinganapur Tourist Centre, District Ahmednagar (Maharashtra)- International Referred Research Journal, Vol. I, ISSN- 0975-3486

2.Dr. M. B. Potdar and Pravin R. Talekar (2011) : Satisfaction Level of Tourist at Religious Tourist Place in Kolhapur District - egkjk'Vª Hkwxksy"kkL= la"kks/ku i=hdk] [kaM- XXVIII vad dz- 1-

3.Dr. B. G. Velapurkar and Dr. N. S. Kore (2009) : A Study of Tourist Behaviour in Sainandanwan at Chakur in Latur District- Shodh, Samiksha aur Mulyankan (International Research Journal)- ISSN-0974-2832 Vol. II, Issue-6.

4.Dr. V. J. Patil and Dr. R. V. Bhole (2008) : A Study of Hillstation Tourist Satisfaction – A Case Study of Mahabadeshwar - Shodh, Samiksha aur Mulyankan (International Research Journal) - ISSN-0974-2832 Vol. II, Issue-5.

5.M. B. Singh and V. K. Singh and Roy Bhaswati (1996) : Behavioural Analysis of Foreign Tourist in Varanasi – National Geographical Journal of India, Vol. 42 March-June 1996.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org